जा.क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/ ८०३० /२०१३
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक:- २३.०१.२०१३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील आस्थापने वरील रिक्त **`` विधी सहाय्यक-१ / अनुरेखक-१ ``** या पदासाठी त्यांच्या नांवा समोर दर्शविलेल्या जात प्रवर्गातुन इच्छुक व पात्र अर्हताधारक / प्रवर्गातील उमेदवारांकडुन खालील प्रमाणे अर्ज स्विकारण्यात येतील.

| परिक्षेचा वेळा पत्रक | |
|---|---|
| दिनांक ११.०२.२०१३ | **<u>उमेदवारांचे अर्ज स्विकारणे :-</u>** सकाळी १०.३० ते दुपारी २.०० व दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मनपाकेच्या मुख्य कार्यालयातील ३रा माळा येथील प्रशिक्षण केंद्र येथे स्विकारण्यात येईल. **( जाहिरातीत नमुद असलेली अर्हता उमेदवार धारण करीत नसल्यास अर्ज स्विकारला जाणार नाही )**<br>**<u>टीप :-</u>** अर्ज पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत उमेदवारांने स्वतः अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| दिनांक १४.०२.२०१३ | उमेदवाराचा अर्ज व जाहीरातीत नमुद शैक्षणिक पात्रताधारण करणाऱ्या पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. |
| दिनांक १५.०२.२०१३ | दि. १५.०२.२०१३ रोजीच्या यादीनुसार पात्र उमेदवारास प्रवेश पत्र (हॉल तीकीट). मनपाकेच्या मुख्य कार्यालयातील ३रा माळा येथील प्रशिक्षण केंद्र येथे देण्यात येईल. |
| **दिनांक १७.०२.२०१३ ( रविवार )**<br>सकाळी १०.०० वाजता **लेखी परिक्षा.** | **<u>लेखी परिक्षा:-</u>** कै. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम परिसर नांदेड येथे घेण्यात येईल व त्याच दिवशी **सर्वसाधारण गुणवत्ता व तोंडी मुलाखतीस गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करणे.** |
| दिनांक १८.०२.२०१३<br>सकाळी ११.०० वाजता **तोंडी मुलाखत** | **तोंडी मुलाखत** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मुख्य प्रशासकिय इमारत येथील ३रा माळा ( गाळा क्रं. ३०२ ) आयुक्त कक्षात घेण्यात येईल. **व त्याच दिवशी गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या सर्व साधारण गुणवत्ता व निवड यादी प्रसिध्द करणे** |

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी | आरक्षणा चा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | **विधी सहाय्यक** | १ | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२००/- | **अनु.जाती** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी.<br>**ब)** शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधीत पदावरील किमान 5 वर्षाचा अनुभव **किंवा** सत्र न्यायालयातील 3 वर्ष वकिलांचा अनुभव धारण करणे आवश्यक. |
| २ | **अनुरेखक** | १ | ५२००-२०२०० ग्रेडपे १९००/- | **अनु. जमाती** | **अ)** शासकिय किंवा शासन मान्यता प्राप्त औद्योगीक प्रशिक्षण संस्थे मधील स्थापत्य विषयातील आरेखनाचा अभ्यासक्रम पुर्ण.<br>**ब)** संगणका मधील Auto Cad अभ्यासक्रम पुर्ण. |

१. उमेदवारांने A-4 साईजच्या जाड पांढऱ्या कागदावर सोबत दिलेल्या विहित नमुण्या मधील अर्ज सादर करावा. अर्ज टंकलेखीत अथवा संगणकीकृत करुन अथवा स्वतःच्या अक्षरात भरलेला व वाचनिय असावा.
२. **<u>अर्जासोबत जाहिरातीत विहित केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे अनिवार्य राहील. मुळ प्रमाणपत्र जोडू नयेत.</u>**
३. उमेदवारांने अर्जावर अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो चिटकवून, फोटोवर उमेदवारांनी स्वतःची स्वाक्षरी करावी. तसेच उमेदवारानी अर्जासोबत **दोन (२)** जास्तीच्या फोटो देवुन फोटोच्या मागे आपले नांव व पत्ता लिहावा.
४. वरील पदासाठी लेखी परिक्षा दि. **१७.०२.२०१३** रोजी सकाळी १०.०० वाजता कै. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडीयम परिसर येथे घेण्यात येईल, प्रश्नपत्रिका सामान्यज्ञान, बुध्दीमापन चाचणी, संबंधीत विषयावरील, तांत्रीक प्रश्न, स्थानिक माहिती बहुपर्यायीवस्तुनिष्ठ प्रश्न राहतील.
५. वरील पदासाठी **दि. १७.०२.२०१३ रोजी लेखी परिक्षा ९०** गुणांची घेण्यात येईल.
६. **लेखी परिक्षेत गुणानुक्रमे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची १० गुणांची तोंडी मुलाखत दिनांक १८.०२.२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मनपाकेच्या नविन प्रशासकिय इमारत ३रा माळा येथे आयुक्त कक्षात घेण्यात येईल.**
७. परिक्षेसाठी उत्तर पत्रिका स्वतंत्र देण्यात येईल **परिक्षेसाठी काळया शाईचा बालपेन वापरणे आवश्यक राहील.**
८. **<u>उमेदवारांने अर्जा सोबत राष्ट्रीयकृत बँकेचा मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर) चा डि. डि. `` Commissioner Nanded Waghala City Municipal Corporation Nanded `` या नावाने जोडणे बंधनकारक राहील ज्या उमेदवारांनी अर्जा सोबत डि.डी. जोडलेले नसतील त्यांचे अर्ज स्विकारले जाणार नाही.</u>**
९. **परिक्षा प्रेक्षागृहातील खुर्चीवर बसुन द्यावयाची असल्यामुळे परिक्षेला येतांना परिक्षा पॅड वापरणे आवश्यक राहील**
१०. मुलाखतीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**<u>निवड यादी:-</u>**

१. **सदरची निवड यादी एक वर्षा पर्यंत अस्तित्वात राहील.**

**<u>इतर अटी व शर्ती:-</u>**

१. अर्जासोबत जाहीरातीत नमुद शैक्षणिक अर्हता, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत (एसएससी) प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, इत्यादी आवश्यकत्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेले असणे बंधनकारक आहे.

२. **अनुक्रमांक 1 च्या पदासाठी** शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधीत पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.

३. **अनुक्रमांक 1 च्या पदासाठी** सत्र न्यायालयातील 3 वर्ष वकिलांचा अनुभव असलेले जिल्हा सत्र न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडील निर्गमीत केलेले अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.

४. संगणक अर्हताधारक / MSCIT धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब मंत्रालय मुंबई दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदीनुसार आरक्षीत पदावर निवड झालेल्या उमेदवारास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासनी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोंच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील. अशा उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांका पासुन ६ महिण्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल.

६. उमेदवार **महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा व त्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडील प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडणे** अनिवार्य राहील.

७. **माजी सैनिक उमेदवारा** करिता शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दिनांक १० ऑक्टोंबर १९८० व दिनांक १६ एप्रिल १९८१ नुसार शासन सेवे करिता पात्र राहील.

८. **खेळाडूच्या** व्यक्तीगत अथवा सांघीक क्रिडा स्पर्धा मध्ये किमान राज्य अजिक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय, अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण/रौप्य किंवा कास्यपदक प्राप्त करणारा खेळाडू, राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळाचा महाराष्ट्र ऑलाम्पीक असोसिएशनसी सलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्यात अथवा ऑलाम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजीत केलेल्या असाव्यात किमान प्रावीण्यापेक्षा उच्चस्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. व्यक्तीगत रित्या किंवा आमंत्रीत स्वरुपाच्या स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या खेळाडूचा विचार करता येणार नाही.

**९. उपरोक्त पदांसाठी परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षाचा राहील प्रथम वर्षाची सेवा समाधानकारक असल्यासच दुसऱ्या वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल. काम समाधानकारक नसल्यास सेवेतुन कमी करण्यात येईल.**

१०. **अंशकालीन** उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणीची साक्षांकित प्रत प्रवेशपत्रा सोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच समांतर आरक्षणातील उमेदवारांनी समांतर आरक्षणा बाबतचा पुरावा प्रवेश पत्रा सोबत जोडणे आवश्यक राहील.

११. **<u>वयोमर्यादा :-</u>** वरील पदांसाठी **अर्जदाराचे वय उपरोक्त जाहीरातीच्या दिनांकास किमान १८ व कमाल ३८ वर्षा पर्यंत राहील** (खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवुन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील) माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी व प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रसत उमेदवारांसाठी शासन निर्णयानुसार राहील.

१२. महाराष्ट्र शासन नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ अन्वये विहित उमेदवारांनी त्यांचे दिनांक २८.३.२००५ अन्वये रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१३. जाहिरातीमधील भरावयांच्या पदांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. त्यासाठी सक्षम प्रधिकाऱ्याकडील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती (साक्षांकित) देणे बंधनकारक राहील.

१४. उमेदवारास परिक्षेकरिता स्वखर्चाने यावे लागेल व त्याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.

१५. निवड प्रक्रियतील किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी चुकीची माहिती / प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर केलेचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याची निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल, तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

१६. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारां सोबत या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची निवड रद्द / अपात्र ठरविण्यात येईल.

१८. सदरील भरतीस शासन निर्णय / परिपत्रके जसेच्या तसेच लागु राहतील.

१९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत जोडणे आवश्यक राहील.

२०. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

२१. उमेदवारांनी अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली. म्हणजे लेखी परीक्षेस पात्र असल्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे असणार नाही.

**२२. शासकिय / निमशासकिय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या परवानगीने अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच अर्जा सोबत परवानगी पत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहील.**

**२३. ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी नियुक्ती पुर्वी संबंधित जिल्हयाचे पोलिस अधिक्षक यांचेकडून चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

**२४. ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकीत्सक,** श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक शासकिय रुग्णालय, नांदेड. **यांचेकडून** शासकीय सेवे करीता शारीरिक पात्रता विषयक तपासणी **प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

२५. शासन वित्त विभाग निर्णय क्रं. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नविन परिभाषीत अशंदान निवृत्ती योजना लागू राहील. या शिवाय संबंधीतांना सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२६. सदर जाहिरात व अर्जाचा नमुना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड च्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध आहे त्याचा पत्ता **www.nwcmc.gov.in** असा आहे.

२७. **खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील.**

१) अर्जाच्या तारखेस विहित शैक्षणिक अर्हता / पात्रता / वय धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.
२) अपुर्ण /चुकीचे / खडाखोड केलेले / अर्जा सोबत नमुद रक्कमेचा डि. डि. न जोडलेले / उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले अर्ज.
३) आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज.
४) कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र विहित नमुण्यात न भरलेला अर्ज.
५) महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज.
६) उमेदवाराचा अर्ज कोणत्याही त्रुटीमुळे रद्द झाल्यास त्या बाबत कोणतीही दखल घेतली जाणार नाही अथवा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

**आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड **करिता/-**

**प्रत:-** मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात येते.

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

## विधी सहाय्यक / अनुरेखक या पदासाठी अर्ज

उमेदवाराचा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वत:च्या स्वाक्षरीसह

**प्रति**
**मा. आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड.

**विषय :-** -------------- पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.
संदर्भ :- दैनिक---------------------- वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात

उपरोक्त जाहीरातीच्या संबधाने मी, ---------------------- या पदासाठी अर्ज सादर करीत आहे व त्याची आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव : ----------------------------------------------------------------
मराठी मध्ये ( आडनांव प्रथम) ----------------------------------------------------------------
**इंग्रजी मध्ये**
(SURNAME FIRST) ----------------------------------------------------------------
(CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------

२. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता ----------------------------------------------------------------
**मराठी मध्ये** ----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------
**इंग्रजी मध्ये** (CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

३. कायमचा संपूर्ण पत्ता **(मराठी मध्ये)** ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

कायमचा संपूर्ण पत्ता **(इंग्रजी मध्ये)** ----------------------------------------------------------------
(CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

४. जात / पोटजात (असल्यास) ----------------------------------------------------------------
५. **जातीचा प्रवर्ग** ----------------------------------------------------------------

६. **Commissioner Nanded Waghala City Municipal Corporation Nanded** या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा डि.डि. काढला असल्यास :-
बँकेचे नांव ------------------------------------------------------
डि.डि. क्रं.--------------- रुपये ------------ दिनांक -------------

७. जन्म तारीख (अंकात) दिनांक----- महिना------- वर्ष----------
८. जन्म तारीख अक्षरात ----------------------------------------------------------------
९. **जाहिरातीच्या दिनांकास वय** वर्ष -------- महिने ------- दिवस -------
१०. राष्ट्रीयत्व ----------------------------------------------------------------
११. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय होय / नाही
१२. उमेदवार पुरुष अथवा स्त्री पुरुष / स्त्री
१३. अर्जदाराची शैक्षणिक पात्रता:-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्थेचे / मंडळाचे / विद्यापिठाचे नांव | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी (१० वी) | | | |
| २ | एच.एस.सी (१२वी) | | | |
| ३ | | | | |
| ४ | संगणक प्रमाणपत्र/पदविका | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | सेवा योजन व इतर कार्याल्याचे नांव | नोंदणी क्रं. | दिनांकः- | |
| ६ | कामाचा अनुभव असल्यास | **कार्यालयाचे नांवः-**<br><br>**कालावधीः-** | **पदाचे नांवः-**<br><br>सध्या कार्यरत आहे कायः-<br><br>होय/नाही | **वेतनः-** |

असे प्रमाणित करतो/करते की, मी **विधी सहाय्यक / अनुरेखक** या पदा करीता अर्ज केला असुन मी जाहीरात योग्य रितीने वाचली असून मला जाहीराती सर्व मधील अटी व शर्ती मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात आल्यास माझा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती अधिकारी जो निर्णय देईल तो मला मान्य राहील.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे संपूर्ण नांव-----------------

---

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना-अ**

**प्रतिज्ञापन नमुना अ - ( नियम ४ पहा)**

मी, श्री / श्रीमती / कुमारी ----------------------------------------------------श्री ------------------------------ यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी, वय ------ वर्ष, राहणार ------------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की, (१) मी ------------------------ पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ------ ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे. ( असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे मी असेही प्रमाणिक करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधिल राहील.**

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **सही**

( उमेदवाराचे नांव -------------------------------)

**(टिप :- अविवाहीत असल्यास तसे नमुद करुन प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरीत करावी )**